| MHSN060022102023 | **नियमित दिवाणी दावा : २५९/२०२३**<br>सौ. कल्पना कांबळे उर्फ तासगांवकर वगैरे<br>वि. श्री. शामराव जळके वगैरे |
|---|---|

## निशाणी १२ खालील आदेश

**१.** प्रस्तुत अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दाखल केलेला आहे. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.३ रंजना पांडूरंग कांबळे हया दिनांक ०८/११/२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. मयत प्रतिवादी क्र.३ यांना अर्जात नमुद ३ अ ते ३ क हेच कायदेशीर वारस आहेत. तरी यातील प्रतिवादी क्र.३ यांच्या नावास कंस करुन त्यापुढे "मयत" असा शब्द लिहून अर्जात नमूद केलेप्रमाणे वारसांची नोंद दावेकामी करणेस परवानगी मिळणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

**२.** प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे देवून योग्य ते आदेश होणेकामी विनंती केली.

**३.** अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अर्जाचे, प्रकरणाचे व दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जामधील कथने वादी यांनी शपथेवर सांगितलेली आहेत. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटप, जाहीर ठराव, दरम्यानचे उत्तपन्न व निरंतर ताकिदी करिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.३ रंजना पांडूरंग कांबळे हया दिनांक ०८/११/२०२३ रोजी मयत झाल्याचे निशाणी क्र. २० कडे दाखल असलेल्या मृत्यू प्रमाणपत्रांवरुन दिसून येते. त्यामुळे दाव्याच्या अंतिम निकालाकरीता मयत पक्षकाराचे प्रतिनिधी अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. मयत प्रतिवादी क्र.३ यांचे अर्जात दिल्याप्रमाणे वारसदार असल्यामुळे त्यांना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्यावरुन त्यांचा दावा चालविणेचा अधिकार अबाधित आहे. यावरुन एकंदरीत सर्व बाजूंचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** वादींचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.३ रंजना पांडूरंग कांबळे यांचे नावापुढे "मयत" असा शब्द लिहून त्यांचे अर्जात नमुद वारस अनुक्रमे ३ अ ते ३ क हे पुढील तारखेपर्यंत किंवा तत्पुर्वी अभिलेखावर घ्यावेत व तशी दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

NIRANJAN BALASAHEB CHAVAN

Digitally signed by NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Date: 2024.04.30 17:47:32 +0530

मिरज **(नि. बा. चव्हाण)**

दिनांक : ३०/०४/२०२४ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

मिरज

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Sou. A.C. Patil, (Grade-III) |
| Court | : | 4th Jt. Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Miraj. |
| Date | : | 30/04/2024 |
| Order signed by the Presiding Officer | : | 30/04/2024 |
| Order uploaded on | : | 30/04/2024 |